**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र - 09.15 P.M.**

**दिनांक: 02.03.2021** **वार: मंगळवार**

**ठळक बातम्या**

1. **सागरी अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात जागतिक पातळीवर अग्रणी भूमिका घेण्यासाठी भारत उत्सुक असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन**

2. **देशभरात 1कोटी 48 लाखांहून अधिक जणांना कोविड प्रतिबंधात्मक लस देण्यात आल्याची आरोग्य मंत्रालयाची माहिती**

3. **गुजरातमधल्या नगर परिषदा, पंचायतींच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला मोठं यश**

4. **स्टेट बँक ऑफ इंडियाकडून गृह कर्जाच्या व्याजदरात कपात**

**पंतप्रधान**

सागरी अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी भारतात अनेक महत्त्वपूर्ण पावलं उचलली जात असून या क्षेत्रात जागतिक पातळीवर अग्रणी भूमिका घेण्यासाठी भारत उत्सुक आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. बंदर, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाच्या वतीने आयोजित केलेल्या ‘मेरीटाइम इंडिया समिट-2021’ चं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते आज दूर दृश्य प्रणालीच्या माध्यमातून झालं त्यावेळी ते बोलत होते.

सागरी अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात भारत लक्षणीय प्रगती करेल असा विश्वास मोदी यांनी यावेळी व्यक्त केला. सागरी पायाभूत सुविधांचा विकास, प्रमुख बंदरांचा विकास या बरोबरच या क्षेत्रात अधिकाधिक गुंतवणूक वाढवण्यासाठीही प्रयत्न केले जात असून; याद्वारे आत्मनिर्भर भारताचं उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

सागरमाला योजने अंतर्गत 82 अब्ज डॉलर्स खर्चाचे 574 प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. तसंच जलमार्गांचा विकास करण्यासाठी मोठी गुंतवणूक होत असल्याचं पंतप्रधान म्हणाले. येत्या 2030 पर्यंत 23 जलमार्ग विकसित करण्याचं उद्दिष्ट ठेवलं असून 78 दीपस्तंभांच्या परिसरात पर्यटन विकास करण्यासाठी कृती आराखडा तयार केला असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. या क्षेत्रात जागतिक समुदायानं आणि खासगी क्षेत्रांनी गुंतवणूक करावी असं आवाहनही मोदी यांनी केलं. डेनमार्कचे परिवहन मंत्री बैनी एंगलबर्ख, गुजरात आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि मनसुख मांडवीय या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## <u>देश-कोविड आकडेवारी</u>

देशभरातील आतापर्यंतच्या एकंदर कोरोना बाधितांपैकी सद्यस्थितीत 1 पूर्णांक 51 टक्के रुग्ण उपचाराधीन आहेत असं, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने आज प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हंटल आहे. देशाचा कोविड 19 मधून रुग्ण बरे होण्याचा दर आता 97 टक्के झाला आहे. महाराष्ट्र आणि केरळ या दोनच राज्यात 40 हजारांहून अधिक उपचाराधीन रुग्ण असून, देशाच्या तुलनेत ही टक्केवारी 75 टक्के आहे अशी माहिती आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी आज नवी दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

महाराष्ट्र, तमिळ नाडू, पंजाब आणि गुजरात या राज्यातील वाढत्या रुग्ण संख्येला आळा घालण्यासाठी मदत म्हणून, या राज्यात केंद्रीय पथक पाठवण्यात आली

आहेत असं भूषण यांनी सांगितलं.  गेल्या दोन आठवड्यात नव्याने बाधित होणार्या दैनंदिन  रुग्ण संख्येत किरकोळ वाढ झाल्याचं ते म्हणाले. देशभरात सध्या 1,68,358 रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

आज दुपारी एक वाजेपर्यंत देशभरात 1 कोटी 48 लाखांहून अधिक जणांना कोविड प्रतिबंधात्मक लस देण्यात आली असल्याचं भूषण यांनी सांगितलं. यापैकी 2 लाखांहून अधिक रुग्ण 60 वर्षे वयावरील, आणि  45 ते 59वयोगटातील अन्य आजार असलेले आहेत. नऊ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये, 100टक्के अथवा 90टक्क्यांहून जास्त नोंदणीकृत आरोग्य कर्मचार्यांना लशीची पहिली मात्र देण्यात आली आहे.

**<u>किशन रेड्डी-लसीकरण</u>**

केंद्रीय गृह राज्य मंत्री जी. किशन रेड्डी यांनी आज सिकंदराबाद इथ कोविद प्रतिबंधात्मक लशीची पहिली मात्र टोचून घेतली. तेलंगण मध्ये सध्या 60 वर्षे आणि त्यापुढील तसंच 45वर्षे वयाच्या अन्य आजार असलेल्या व्यक्तींसाठी लसिकरणाचा दुसरा टप्पा सुरु आहे. या लसीकरणासाठी पात्र असलेल्या व्यक्तींनी पुढे येऊन लस टोचून घ्यावी असं आवाहन रेड्डी यांनी यावेळी केलं.

**<u>रवि शास्त्री, हर्षवर्धन,-लसीकरण</u>**

भारतीय क्रिकेट संघाचे प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी देखील आज कोविड प्रतिबंधात्मक लशीची पहिली मात्र घेतली. त्याचप्रमाणे, केंद्रीय आरोग्य मंत्री हर्षवर्धन आणि त्यांच्या पत्नी यांनीही आज कोविड लस टोचून घेतली.

## आसाम पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील निवडणुकीची अधिसूचना आज जारी करण्यात आली. या टप्प्यासाठी 9 मार्च पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येऊ शकतील, तर, 12मार्च पर्यंत उमेदवार अर्ज मागे घेता येतील. पाच जिल्ह्यांच्या तीस विधानसभा मतदार संघात 27 मार्च ला मतदान होईल. मतदानाची वेळ संध्याकाळी साडे सहा वाजेपर्यंत वाढवण्यात आली आहे. पश्चिम बंगालचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी संजय बसू यांनी आज आकाशवाणीला हि माहिती दिली. राज्यात एकंदर आठ टप्प्यांत मतदान होणार आहे.

आसाम विधानसभेच्या 47 जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीच्य अधिसूचनाही आज जारी करण्यात आली. आसाम मध्ये तीन टप्प्यात निवडणुका होणार आहेत. 27 मार्च ला पहिल्या टप्प्यात मतदान होणार आहे. अधिसूचना जारी झाल्यावर लगेचच उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

## गुजरात-निकाल

गुजरात मध्ये नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषदा, जिल्हा तसंच तालुका पंचायतींच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने भरघोस यश मिळवल आहे. आतापर्यंत 803 नगर परिषदा, 246 जिल्हा पंचायती, तर तालुका पंचायतींच्या 1036 जागांवर भाजपा उमेदवार विजयी झाले आहेत. कॉंग्रेस पक्षाने 159 नगर परिषदा, 55 जिल्हा पंचायती, तर तालुका पंचायतींच्या 388 जागा मिळवल्या आहेत.

## पंतप्रधान- गुजरात निकाल

गुजरात मध्ये झालेल्या नगर परिषदा, जिल्हा आणि तालुका पंचायातीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या भरघोस यशावरून, हे स्पष्ट होत कि गुजरातची जनता पक्षाच्या विकास आणि सुशासन या दोन मुद्द्यांच्या सोबत आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीटर संदेशात म्हंटल आहे. या निवडणुकीत जनतेने पक्षावर दाखवलेल्या प्रेम आणि विश्वासाबद्दल मोदी यांनी गुजरातच्या जनतेचे आभार मानले.

## मध्य प्रदेश – अर्थसंकल्प

मध्य प्रदेशचे अर्थमंत्री जगदीश देवडा यांनी आज राज्याचं, 2,41,375 कोटी रुपयाचा अर्थसंकल्प विधानसभेत सादर केला. या अर्थसंकल्पात, पायाभूत सुविधा, शिक्षण, शेतकरी आणि महिला क्षेत्रावर विशेष लक्ष पुरवण्यात आलं आहे. कोणतेही नवे कर लागू करण्यात आले नसून, कोणत्याही करदरात फेरबदल करण्यात आलेले नाहीत. वित्तीय संस्थांमार्फत तरुणांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने एक नवीन योजना या अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आली आहे. तसंच या अर्थसंकल्पात, भोपाळ इथं पोलीस रुग्णालय उभारण्याचं प्रस्तावित असून, राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात महिला पोलीस स्थानक उभारण्यात येणार आहे.

## महाराष्ट्र विधिमंडळ

महाराष्ट्र विधी मंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज दुसऱ्या दिवशी राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या आभारदर्शक प्रस्तावावरच्या चर्चेला सुरुवात झाली. विधानसभेत शिवसेनेचे सुनील प्रभू यांनी चर्चेला सुरुवात केली. कोरोनाच्या काळात महसुलात मोठी घट झाली, केंद्राकडून जीएसटी ची वाढलेली थकबाकी असूनही शेतकऱ्यांना दिलासा देण्याचं काम सरकारनं केलं, असं त्यांनी सांगितलं.

या चर्चेत सहभागी होताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सरकारवर टीकास्त्र सोडलं. हे सरकार संवेदनशील नसल्याचा आरोप त्यांनी केला. संकटकाळात शेतकऱ्यांना सरकारनं मदत दिली नाही, कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे. पूजा चव्हाण मृत्यूप्रकरणी कारवाई का नाही असा सवाल त्यांनी केला.

शेतकऱ्यांचे कृषीपंप आणि वीज ग्राहकांच्या थकबाकीसंदर्भात विधीमंडळात चर्चा होऊन निर्णय होईपर्यंत कुणाचीही वीज जोडणी कापू नये, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. विधीमंडळ अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज विधानसभेत प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून विजेवर चर्चा घेण्याचा आग्रह विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी धरला. त्यावर वीज थकबाकी संदर्भात विशेष बैठक आयोजित करुन चर्चा करण्याची सरकारची तयारी असल्याचं उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात. या बातम्या आपण न्यूज ऑन एआयआर ॲपवर देखील ऐकू शकता. ताज्या अपडेट्ससाठी आपण आम्हाला फॉलो करु शकता आमचं ट्विटर हँडल ॲट एआयआरन्यूज पुणे, फेसबुक पेज ऑल इंडिया रेडियो न्यूज पुणे आणि मराठी न्यूज पुणे ऑल इंडिया रेड़ियो या आमच्या युट्युब चॅनेलवर.

**<u>भारत-यु. एन.</u>**

संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार परिषदेत आपल्या उत्तर देण्याच्या अधिकाराचा वापर करत आज भारताने पाकिस्तानला खडे बोल सुनावले. संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेल्या दहशतवाद्यांचं पाकिस्तान हे आश्रयस्थान आहे असं भारतीय अभियानाचे यु एन मधील प्रतीनिधी पवन बधे यांनी म्हंटलं आहे. इतकंच नव्हे, तर, दहशतवाद्यांना पाकिस्तान निवृत्तीवेतन तर देत नाही ना,अशी शंका येण्या

इतपत पाकीस्तानचं वर्तन संशयास्पद असल्याचं बढे म्हणाले.

**<u>महिला दिन</u>**

जगभरातल्या अन्य विकसित देशांच्या तुलनेत भारतात व्यावसायिक महिला वैमानिकांची संख्या सर्वाधिक आहे. येत्या 8 मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्तानं ऐकुया भारतीय महिला वैमानिकांची ही यशोगाथा:

10 जानेवारी 2021 हा दिवस भारतीय हवाई वाहतूक क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक दिवस म्हणावा लागेल; कारण या दिवशी सर्व महिला वैमानिक असलेल्या एअर इंडियाच्या विमानानं उत्तर धृवाच्या दिशेनं उड्डाण केलं. सॅन फ्रान्सिस्को ते बंगळूरू असा हा हवाई प्रवास एकही थांबा न घेता केलेला सर्वाधिक अंतराचा विमान प्रवास होता. तोही अत्यंत आव्हानात्मक अशा उत्तर ध्रुवाच्या मार्गानं! प्रचंड अवघड आणि निर्जन अशा या प्रदेशातून केलेला हा विमान प्रवास अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण होता. उत्तर गोलार्धातून प्रवास केल्यानं अंतर कमी होणार होतं आणि परिणामी 5 हजार किलो इंधनाची बचतही होणार होती. कॅपटन झोया अग्रवाल आणि त्यांच्या सहकारी कॅपटन पापागरी थांमेयी, फर्स्ट ऑफीसर कॅपटन आकांक्षा सोनावणे आणि कॅपटन शिवानी मनहास यांनी केलेली ही ऐतिहासिक कामगिरी या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या युवतींसाठी नक्कीच प्रेरणादाई ठरेल!

**<u>स्टेट बँक - व्याज दर कपात</u>**

स्टेट बँक ऑफ इंडियाने गृह कर्जाच्या व्याजदरात कपात केली आहे. 75लाखांच्या गृह कर्जापर्यंत 6 पूर्णांक 70 टक्के व्याज दर आकारण्यात येणार असून, 75 लाखांपुढील गृह कर्जावर 6 पूर्णांक 75शतांश टक्के व्याज आकारण्यात

येईल. नवीन कर्ज दराची ही योजना 31 मार्च पर्यंत उपलब्ध असून, कर्जदाराला प्रक्रिया शुल्कावर 100टक्के सूट देण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिना निमित्त महिला कर्जदारांना विशेष सूट ही बँकेने जाहीर केली आहे.

**<u>बांगलादेश-नवीन- रेल्वे</u>**

बांगलादेश मुक्तीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त, ढाका ते जलपायगुडी दरम्यान एक विशेष रेल्वे गाडी चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बांग्लादेश मुक्तीची 50 वर्षे आणि बंगबंधू शेख मुजीब यांच्या जन्मशताब्दी दिनी, 26 मार्च पासून ही नवीन रेल्वे गाडी सुरु करण्यात येईल तसंच, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्या हस्ते गाडीला हिरवा झेंडा दाखवण्यात येईल असं बंग्लादेश रेल्वे मंत्रालयातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात म्हंटल आहे. सध्या भारत आणि बांग्लादेश दरम्यान मैत्री एक्स्प्रेस आणि बंधन एक्स्प्रेस या दोन रेल्वेगाड्या धावत आहेत.

**<u>राज्य सभा - लोक सभा टीव्ही.-एकत्रीकरण</u>**

राज्य सभा टी.व्ही. आणि लोक सभा टी.व्ही. या दूरदर्शन वाहिन्यांचं एकत्रीकरण करण्यात आलं असून, आता त्याला संसद टी. व्ही.असं नाव देण्यात आलं आहे. निवृत्त प्रशासकीय अधिकारी रवी कपूर यांची या नव्या वाहिनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. संसद टी. व्ही. च्या माध्यमातून दोन्ही सभागृहाचं कामकाज एकाच वेळी प्रसारीत करण्यात येईल. दोन्ही वाहिन्यांचं एकत्रीकरण करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालावरून, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि राज्य सभा अध्यक्ष एम. वेन्कैया नायडू यांनी संयुक्तपणे हा निर्णय घेतला.

**म्यानमा-निदर्शने**

म्यानमा मधील लष्करी राजवटीविरुद्ध, राजधानी यांगून मध्ये विविध भागात लष्कराच्या विरोधात नागरिकांची घोषणाबाजी सुरूच आहे. आतापर्यंत 21 निदर्शकांचा यात बळी गेला आहे.

**स्वित्झरलँड-**

भारत हा सर्वात नावोन्मेषक देशांपैकी एक असून, २ हजार २१ च्या अर्थसंकल्पात संशोधन आणि विकासाप्रती करण्यात आलेल्या तरतुदींवरून हे स्पष्ट होत असं प्रतिपादन स्वित्झरलँडचे भारतातील राजदूत डॉक्टर राल्फ हेक्नर यांनी केलं आहे. ते आज जैव-तंत्रज्ञान विषयावरील परिषदेत बोलत होते.  केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर हर्षवर्धन यांच्या हस्ते काल या परीषदेचं उद्धाटन झालं. तीन दिवस चालणार्या या परिषदेत जैव-तंत्रज्ञान विषयावरील अनेकविध पैलूंवर चर्चा होत आहे.

**यु पी आय – व्यवहार**

युनिफ़ाइड पेमेंट इंटरफेस अर्थात यु पी आय द्वारा फेब्रुवारी  महिन्यात 4,25,000 कोटी रुपयांचे व्यवहार नोंदवण्यात आले आहेत. राष्ट्रीय देयक महामंडळ अर्थात नेशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने हि आकडेवारी जाहीर केली आहे. या महिन्यात,  यु पी आय द्वारा झालेल्या व्यवहारामध्ये, फोन पे ॲप ने गुगल पे ला मागे टाकल्याचं दिसून येत आहे.

## **हॉकी**

युरोपीय हॉकी मालिकेत आज भारताचा सामना जर्मनीबरोबर होणार आहे. या स्पर्धेतला भारताचा हा दुसरा सामना असून भारतीय वेळेनुसार तो रात्री साडे आठ वाजता सुरू होईल. जवळपास एक वर्षानंतर पहिला आंतरराष्ट्रीय सामना खेळणाऱ्या भारतीय संघानं रविवारी अप्रतिम खेळ करत जर्मनीचा 6-1 असं धुव्वा उडवला होता. आजच्या सामन्यानंतर भारतीय संघ बेल्जियममध्ये अँटवर्प इथं जाणार असून याठिकाणी त्यांचा 6 आणि 8 मार्चला ग्रेट ब्रिटनबरोबर मुकाबला होणार आहे. यानंतर भारतीय संघाचा 17 दिवसांचा दौरा समाप्त होईल.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं; कोरोनावरील लसीकरणाचा दुसरा टप्पा दोन श्रेणीतील नागरिकांसाठी सुरु झाला आहे. त्याचा आवश्य लाभ घ्या. संसर्ग रोखण्यासाठी मास्क वापरा; स्वच्छता पाळा; अंतर राखा आणि विश्वासार्ह बातम्यांसाठी ऐकत रहा, आकाशवाणी, नमस्कार.